दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक ११३ • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.१८ जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# राष्ट्रवादीच्या सूनावणीसाठी विधानसभा अध्यक्ष अधिकचा वेळ मागण्याची शक्यता

## राष्ट्रवादीची सुनावणी शिवसेनेपेक्षा वेगळी



**मुंबई**–राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष विधानसभा सदस्य अपात्रता सुनावणीसाठी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर सुनावणीसाठी अधिकचा वेळ मागणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. सुप्रीम कोर्टाकडून ३१ जानेवारी पूर्वी निर्णय घेण्याचे राहुल नार्वेकर यांना निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, नार्वेकर ७ दिवसांचा अधिकचा वेळ मागणार असल्याची माहिती आहे.दरम्यान राहुल नार्वेकर २६ जानेवारी पर्यंत सुनावणी पूर्ण करणार आणि त्यानंतर सुनावणीचा निकाल राखून ठेवणार असल्याची देखील माहिती आहे.राष्ट्रवादीची सुनावणी शिवसेनेच्या सुनावणी पेक्षा वेगळी असल्याने अधिकचा वेळ लागत असल्याची सूत्रांची माहिती आहे.राष्ट्रवादी आमदार अपात्रतेसंदर्भात विधानसभा अध्यक्षांसमोर बंद दाराआड झालेल्या कालच्या सुनावणीत याचिका एकत्रित करण्याचा निर्णय घेण्यात आल्या आहेत. एकूण पाच याचिका दोन गटांत एकत्रित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. २६ जानेवारीपर्यंत सुनावणी पूर्ण करण्याचे नियोजन आहे. पुढील सुनावणीत साक्षीदार निश्चित केले जाणार आहे. १८ जानेवारीला पुढील सुनावणी होणार आहे.राष्ट्रवादी आमदार अपात्रतेसंदर्भात शेड्युल १० चा सेक्शन २ (A) अंतर्गत राष्ट्रवादीची सुनावणी घेण्यात येणार आहे. २A अंतर्गत अजित पवार गटावर स्वतःहून राजकीय पक्ष सोडल्याने त्यांना अपात्र करावे अशी शरद पवार गटाची मागणी आहे.विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर सुनावणीसाठी अधिकचा वेळ मागणार आहे. राहुल नार्वेकर सात दिवसांचा अधिकचा वेळ मागणार असल्याची माहिती समोर येत आहे. सुप्रीम कोर्टाकडून ३१ जानेवारी पूर्वी निर्णय घेण्याचे राहुल नार्वेकर यांना निर्देश देण्यात आले आहे. राहुल नार्वेकर २६ जानेवारीपर्यंत सुनावणी पूर्ण करणार आणि त्यानंतर सुनावणीचा निकाल राखून ठेवणार आहे. राष्ट्रवादीची सुनावणी शिवसेनेच्या सुनावणीपेक्षा वेगळी असल्याने अधिकचा वेळ लागत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

# पत्रकार दिनानिमीत्त तालुक्यांतील पत्रकारांचा पार पडला सत्कार

## पत्रकारांनी आपल्या लेखणीतून वास्तव मांडावं–देवराव भोंगळे

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**



पत्रकार दिनाच्या पार्श्वभूमीवर नुकतच गोंडपिपरी येथे सुधीर मुनगंटीवार सेवा केंद्रातर्फे आयोजित केलेल्या पत्रकार बंधूंच्या सन्मान सोहळ्यास उपस्थित राहून जमलेल्या पत्रकार बांधवाना शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान केला.

याप्रसंगी उपस्थित पत्रकार बंधूना पत्रकार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यासोबतच रंगीबेरंगी कागदावर गुळगुळीत मजकूर छापणे हे वृत्तपत्रकर्त्याचे काम नाही, तर चालत्या काळाचे वर्तमान कळविणे आणि लोकांस योग्यतेस येण्याचे मार्ग दाखविणे हे वृत्तपत्रकर्त्याचे काम आहे. अगदी त्यानुसारच कुठल्याही दबावाला बळी न पडता समाजाला केंद्रस्थानी ठेवत आपण आपल्या लेखणीतून वास्तव मांडावं. असे प्रतिपादन याठिकाणी बोलताना केले.यावेळी तालुकाध्यक्ष बबन निकोडे, जिल्हा कार्य. सदस्य संजय उपगण्लावार, माजी पं. स. सभापती दिपक सातपुते, शहराध्यक्ष चेतन गौर, माजी जि. प. सदस्य अमर बोडलावार, राकेश पुन सा. माडुरवार, कृ. उ. बा. स. सभापती इंद्रपाल धुडसे, गणपती चौधरी, माजी जि. प. सदस्य स्वातीताई वडपल्लीवार, संजय झाडे, मनिष वासमवार, सुरेखाताई श्रीकोंडावार, अण्णा उलेंदला पंकज चिलनकर, कोमल फारकाडे, माया वाघाडे, नगरसेविका मनिषा दुर्योधन, अश्विनी तोडासे, भानेश येग्गेवार, बाळू डिंगलवार, तेजस्विनी भगत, सपना तामगाडगे, जिल्हा सोशल मीडिया संयोजक राकेश कोंडबत्तूनवार, पुर्व विदर्भ विभाग संयोजक पुर्व विदर्भ विभाग आयटी सेल सहसंयोजक आशिष चावडा, गौरव चक्रवर्ती, अमोल मोरे, यांचेसह पत्रकार राजु झाडे, अरूण वासलवार, नितेश डोंगरे, , चेतन मांदाळे, बाळू निमगडे, समीर निमगडे, नागेश ईटेकर, चंद्रजित गव्हारे, प्रशांत कोसनकर, प्रमोद दुर्गे, प्रसेनजीत डोंगरे, बाबुराव बोंडे, कुणाल गायकवाड, राजकपुर भडके,सचिन फुलझेले, दिपक वांढरे, दिलीप बच्चुवार, यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

# हनुमान मंदिरात स्वच्छता अभियान, खासदारांनी घेतला हाती झाडू–पोचा

**गडचिरोली । प्रतिनिधी**

येत्या २२ जानेवारीला अयोध्येत होत असलेल्या राम मंदिर प्राणप्रतिष्ठापनेचे औचित्य साधून देशभरात ठिकठिकाणच्या मंदिरांमध्ये स्वच्छता अभियान राबविले जात आहे. बुधवारी गडचिरोलीच्या कॅम्प एरियामधील प्रभाग क्रमांक.- ०६ ,बुथ नंबर- ८७ येथे हनुमान मंदिरात खासदार अशोक नेते यांच्यासह भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी स्वच्छता केली.



हनुमान मंदिराच्या आवारात खासदार नेते यांनी आपल्या हाती झाडू व सफाईचा पोचा घेऊन साफसफाई करून मंदिर स्वच्छ केले. मंदिर स्वच्छ झाल्यानंतर काही घरांच्या भिंतीवर कमळ पोस्टर पेंटिंग करण्यात आले. त्यात खासदार अशोक नेते यांनी 'अब की बार, फिर मोदी सरकार २०२४' असे रेखाटून पुन्हा भाजप सरकारच्या विजयाचा संकल्प केला. सदर स्वच्छता अभियानाला विदर्भ संघटनमंत्री डॉ.उपेंद्र कोठेकर, भाजपा अनु.जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री खा.अशोक नेते, प्रदेश उपाध्यक्ष संजय भेंडे, आमदार डॉ.देवराव होळी, जिल्हाध्यक्ष प्रशांत वाघरे, भाजपचे ज्येष्ठ नेते तथा लोकसभा विस्तारक बाबुराव कोहळे,प्रदेश कार्यकारिणी सदस्य रविंद्र ओल्लालवार, लोकसभा समन्वयक प्रमोद पिपरे, किसान आघाडीचे प्रदेश सरचिटणीस रमेश भुरसे, जिल्हा महामंत्री गोविंद सारडा,जिल्हा महामंत्री योगिता पिपरे, भाजपा ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अनिल पोहनकर,जिल्हा उपाध्यक्ष भारत खटी,जिल्हा उपाध्यक्ष प्रणय खुणे,जिल्हा उपाध्यक्ष मोतीभाई कुकरेजा, चंद्रपुर जिल्हा ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अविनाश पाल,माजी न.प.उपाध्यक्ष अनिल कुनघाडकर,श्रीकांत पतरंगे,आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# श्री छत्रपती मराठा समाज मंडळातर्फे मॉ जिजाऊ जन्मशताब्दी कार्यक्रम साजरा



**पुलगांव । प्रतिनिधी**

स्थानिक पुलगांव येथे श्री छत्रपती मराठा समाज मंडळ, पुलगांव यांच्या वतीने विठ्ठल मंदिर फुटाना लाईन, पुलगांव येथे राजमाता जिजाऊ यांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.


सर्वप्रथम राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पुजन संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत पवार यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन विजय खटके यांनी तर आई भवानी यांच्या प्रतिमेचे पुजन चंद्रकांत कदम यांच्या हस्ते करण्यात आले. दत्ता पाटोळे यांनी राजमाता जिजाऊ यांच्या जीवनावर आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलीमा जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन अर्चना निकम यांनी केले.

कार्यक्रमाअंतर्गत ममता भांडवलकर यांनी सुध्दा जिजाऊ आईसाहेब यांच्या कार्याबद्दल माहिती दिली.वैदेही पवार हिने राजमाता जिजाऊ यांच्या जीवनावर कविता सादर केली. कार्यक्रमाला मराठा समाजातील कार्यकर्ते उपस्थित होते त्यामध्ये नितीन बढे, सचिन जगताप, राजेश बढे, संदीप निकम, जयदीप जाधव,बाबाराव पवार, योगेश गावडे, सुवर्णा जगताप, रंजना पवार, प्रतिभा किर्दक, अर्चना पडोळ, प्रिती गावडे, शिला गावडे यांनी मोलाचे सहकार्य केले. प्रसाद वाटुन कार्यक्रमाची सांगता झाली.

# आर.आर.टीम ला चकमा देऊन वाघाने केली गाईची शिकार;मुलचेरात पुन्हा दहशत

**गडचिरोली । प्रतिनिधी**

आलापल्ली वनविभागात वाघाच्या हल्ल्यात दोन महिलांचा बळी गेल्यानंतर वाघाला जेरबंद करण्याची मागणी होताच मुलचेरा तालुक्यात रॅपिड रिस्पॉन्स टीम दाखल झाली. नरभक्षक वाघाला जेरबंद करण्याची मोहीम सुरू असतानाच रॅपिड रिस्पॉन्स टीम ला चकमा देऊन त्या वाघाने गाईची शिकार केल्याची घटना मुलचेरा तालुक्यातील रेंगेवाही येथे बुधवार (१७ जानेवारी) रोजी सायंकाळच्या सुमारास रोजी घडली.



७ जानेवारी रोजी अहेरी तालुक्यातील चिंतलपेठ येथे वाघाच्या हल्ल्यात सुषमा देवादास मंडल या महिलेचा बळी गेला.तर १५ जानेवारी रोजी मुलचेरा तालुक्यातील कोडसापुर येथील रमाबाई मुंजमकर या महिलेला वाघाच्या हल्ल्यात जीव गमवावा लागला. या दोन घटनांमुळे आलापल्ली वन विभागातील अहेरी आणि मुलचेरा या दोन्ही तालुक्यात प्रचंड दहशत निर्माण झाली. सध्या शेतीचे काम सुरू असताना शेतकऱ्यांना घराबाहेर पडणे कठीण झाल्याने त्या नरभक्षक वाघाला जेरबंद करा अशी मागणी करण्यात आली. मानव आणि वन्यजीव संघर्ष लक्षात घेता वनविभागाने या भागात रॅपिड रिस्पॉन्स टीम बोलावून वाघाला जेरबंद करण्याची मोहीम सुरू केली आहे.

रॅपिड रिस्पॉन्स टीम आणि वनविभागाचे कर्मचारी कोडसापूरच्या जंगलात ट्रॅप कॅमेरे आणि पिंजरा लावून वाघाला जेरबंद करण्याची मोहीम सुरू केली आहे. जवळपास रॅपिड रेस्क्यू टीमचे १० आणि स्थानिक वन विभागाचे २० कर्मचारी वाघाच्या शोधात असतानाच मुलचेरा तालुक्यातील रेंगेवाही गावालगत त्या वाघाने एका गाईचा फडशा पाडला. नेमका ही गाय कोणाची आहे ही माहिती कळू शकली नसली तरी या घटनेमुळे संपूर्ण परिसरात एकच दहशत निर्माण झाली आहे.

# एक दिवसीय शेतकरी मेळावा व जागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन

**नागपूर । प्रतिनिधी**

शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्धोत्पादन, शेळी व कुक्कुटपालन व्यवसाय आणि कौशल्य विकास प्रशिक्षणाचा उपयोग पशुपालकांना आणि शेतकऱ्यांना त्यांचे उत्पन्न दुप्पट होण्यास पर्यायाने त्यांचा सामाजिक आणि आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होईल असे प्रतिपादन डॉ. सुखदेव बारबुधे संचालक, भाकृअनुप–राष्ट्रीय मांस संशोधन संस्था हैद्राबाद यांनी केले. नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयाद्वारे महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर आणि भाकृअनुप, राष्ट्रीय मांस संशोधन संस्था, हैद्राबाद यांच्या वतीने अनुसूचित जाती उपघटक योजना अंतर्गत एक दिवसीय शेतकरी मेळावा व जागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात पशुपालकांच्या क्षमता बांधणीवर विशेष भर देण्यात आला. सदर कार्यक्रमांमध्ये पशुपालन क्षेत्रातील संधी व आव्हाने, भारतातील पशु मांस उद्योग आणि रोजगाराच्या संधी, पशुसंवर्धनामध्ये शेतकरी उत्पादक संघटनेची भूमिका आणि त्याचे महत्त्व, भारतातील दुग्ध व्यवसाय क्षेत्रातील संधी व आव्हाने, शाश्वत उत्पन्न व रोजगार निर्मितीसाठी शेळीपालन व्यवसायामध्ये संधी व आव्हाने इत्यादी महत्त्वाच्या विषयांवर विषय तज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले.डॉ. विजय बसूनाथे यांनी या कार्यक्रमाच्या कार्यक्रमाच्या आयोजना मागची भूमिका विषद करतांना सांगितले की, प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे शेतकऱ्यांना योग्य तांत्रिक ज्ञान मिळते आणि त्यांना सक्षम होण्यासाठी मदत होते. सदर कार्यक्रम हा नि:शुल्क असून यात जवळपास ३५० पेक्षा अधिक शेतकरी आणि पशुपालक यांचा सहभाग होता. सदर कार्यक्रमाप्रसंगी पशुपालन क्षेत्रात ज्यांचे बहुमूल्य योगदान आहे अशा शास्त्रज्ञ, उद्योजक, विषयतज्ञ यांचा देखील सत्कार करण्यात आला. अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन अत्यंत महत्त्वाचे




असून त्यातून शेतकऱ्यांचा आणि पशुपालकांचा आर्थिक विकास साधणार असल्याचा विश्वास उपस्थित पशुपालकांनी व्यक्त केला आणि असे कार्यक्रम सतत मिळत राहावे, अशी अपेक्षाही सर्व उपस्थित पशुपालकांनी व्यक्त केली.याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. सुखदेव बारबुधे, संचालक, भाकृअनुप–राष्ट्रीय मांस संशोधन संस्था, हैद्राबाद तसेच डॉ. अनिल भिकाने, संचालक, विस्तार शिक्षण, महाराष्ट्र पशु आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठ, विशेष अतिथी डॉ. बस्वा रेड्डी, प्रधान वैज्ञानिक, राष्ट्रीय मांस संशोधन संस्था, हैद्राबाद तसेच डॉ. शांताराम गायकवाड, महाव्यवस्थापक, दुग्धविकास, गोविंद दूध व दुग्धजन्य पदार्थ प्रा. लि. फलटण, जि. सातारा, अध्यक्ष डॉ. आरजू सोमकुवर, सहयोगी अधिष्ठाता, नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय नागपूर, आयोजक सचिव डॉ. विजय बसूनाथे, सहयोगी प्राध्यापक ई. उपस्थित होते. तसेच सचिन चिकनकर, गणेश काळे, ओसामा खान, सुहासिनी गजभिये, करण रामटेके, डॉ. उल्हास गळकाटे या शास्त्रज्ञ आणि यशस्वी दुग्धव्यवसाय, शेळी आणि कुक्कुटपालन करणाऱ्या पशुपालकांनी आपल्या अनुभवाचे कथन केले व याप्रसंगी त्यांचा सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे औचित्य साधून तयार करण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते याप्रसंगी करण्यात आले. तसेच सदर कार्यक्रमांमध्ये पशुपालकांशी संवाद व चर्चा यासाठी विशेष सत्र घेण्यात आले.

# राष्ट्रीय सेवा योजना शिबिर काळाची गरज

**राष्ट्रीय सेवा योजना शिबीर म्हणजे महाविद्यालयीन शिक्षण घेत विद्यार्थ्यांना आदर्श नागरिक घडविणारे, मानवतावादी संस्कार देणारे संस्कार केंद्र आहे. 'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे' या साने गुरुजींच्या प्रार्थनेतला खरा माणूस घडविण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना शिबीर करीत असते. महाविद्यालयातील चार भिंतीच्या आत जे शिकायला मिळत नाही ते जे संस्कार आणि जीवनमूल्ये या शिबिरातून शिकायला मिळतात. उत्तम विद्यार्थी घडवायचे असतील तर राष्ट्रीय सेवा योजना शिबिर काळाची गरज झाली आहे.**




भारत हा खेड्यांचा देश आहे. जोपर्यंत खेडी स्वयंपूर्ण होणार नाहीत तोपर्यंत खेड्यांचा विकास होणार नाही अशी राष्ट्रपिता महात्मा गांधींची भूमिका होती. खेड्यातील परिस्थिती लक्षात घेता महात्मा गांधीजींनी 'खेड्याकडे चला' हा संदेश दिला होता. गांधीजींना ग्रामीण भागाविषयी अपार प्रेम होते म्हणूनच त्यांनी वर्धेसारख्या ग्रामीणसदृश्य भागात सेवाग्राम ची स्थापना केली. या सेवाग्रामने सेवेचे रामायण लिहीत संपूर्ण भारतभर नावलौकिक प्राप्त केला. सेवाग्रामचे वास्तव लक्षात घेता गांधीजींची ग्रामीण भागाबाबत भावना व प्रेम लक्षात येते. गांधीजींच्या मनातील ग्रामीण भागाबाबतची स्वप्ने, राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातील विविध प्रकारच्या उपक्रमांतून प्रतिबिंबित होतात.शिक्षण हे तिसरा डोळा आहे असे म्हणतात. शिक्षणाने माणूस डोळस होतो. विचारवंत होतो हा आजवर समज होता. परंतु दुर्दैवाने शिकलेली माणसे ग्रामीण भागापासून दूर होत गेली. ज्यांचे बालपण खेड्यातील मातीत गेले, ज्यांचे बालपण शेतातील धुर्यावर रमले ते सुद्धा शिक्षण घेऊन मोठे झाल्यावर खेड्यापासून खूप दूर गेले. त्यांनी ग्रामीण भागाकडे पाठ फिरविली. महात्माजींना सुशिक्षितांची ही ग्रामीण भागाविषयी उपेक्षा लक्षात आली असावी म्हणून त्यांनी युवाशक्तीचे लक्ष ग्रामीण भागाकडे वळविण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले.

महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनात ग्रामीण भागाविषयी ओढ निर्माण व्हावी. त्यांना ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या जवळून बघता याव्यात . ग्रामीण जीवनात मिसळता यावे यासाठी राष्ट्रीय सेवा योजना या विद्यापीठस्तरीय शैक्षणिक पर्यायाची योजना आखली. राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे युवकांसाठी ग्रामीण भागातील समाजसेवेसाठी हक्काचे विचारपीठ झाले. ते युवकांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग झाले. सुरुवातीला राष्ट्रीय छात्र सेना म्हणजे एनसीसीचा पर्याय म्हणून निर्माण झालेली ही राष्ट्रीय सेवा योजना पुढे क्रियान्वीत झाली. आपल्या विविध अनोख्या रूपाने खऱ्या अर्थाने विद्यार्थी चळवळ झाली. आज महाविद्यालय युवकांच्या मनात ग्रामीण समाजसेवेचे स्फुल्लिंग स्फुरवण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना शिबीर करीत आहे.

२४ सप्टेंबर १९६९ पासून राष्ट्रीय सेवा योजना अस्तित्वात आलेली आहे. चारित्र्यसंपन्न विद्यार्थी घडावा तसेच विद्यार्थ्यांच्या मनामध्ये सामाजिक जाणीव आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना बुद्धिंगत व्हावी हे हेतू मनात ठेवून देशभरात लाखो विद्यार्थ्यांसाठी प्रायोगिक तत्त्वावर ही योजना कार्यान्वित करण्यात आली होती. आता तीची लोकप्रियता विद्यार्थ्यांमध्ये वृद्धिंगत होत असून महाविद्यालयात हजारो विद्यार्थी या योजनेकडे आकर्षित होत आहेत. या योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची व्यक्तिमत्व अष्टपैलू स्वरूपात आकार घेत आहे. शिबिरांच्या माध्यमातून सकारात्मक समाजसेवेसाठी युवाशक्तीचा वापर करण्यावर भर दिला जात आहे. वर्गात चार भिंतीत बसून ज्ञान घेताना ज्या अडचणी येतात. त्या या शिबिराच्या माध्यमातून सात दिवसांत (पूर्वी हा कालावधी दहा दिवस होता) चार भिंतीची मर्यादा तोडून विशाल दृष्टिकोन बाळगत आहे.सामाजिक कार्याशी स्वतः एकरूप होत विद्यार्थी सामाजिक जीवन न्याहाळत आहे. या कालावधीत खेड्यातील समस्या, खेड्यातील अडचणी अत्यंत जवळून बघत आहे. त्यांचे अवलोकन व अभ्यास करीत आहेत. त्यातून या विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातील भावना, विचार, प्रेम, जिव्हाळा, आपुलकी हे अगदी जवळून बघता येत आहे.अनुभवता येत आहे.त्यातून ते ग्रामीण संस्कार आत्मसात करीत आहे. जे संस्कार बीए, बी.कॉम., बीएस्सी पदवी अभ्यासक्रमात तीन वर्षे शिकून प्राप्त होणार नाही ते संस्कार राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर होताना दिसत आहे. या शिबिरातून माणसं घडत आहेत. हे संस्कार ग्रहण केलेले हजारो विद्यार्थी पुढे या देशाचे नागरिक होणार आहे. कोणी अधिकारी होईल. कोणी साहेब होईल. कोणी वेगवेगळ्या पदावर जाईल. तिथे पोचल्यावर त्यांना ग्रामीण भागातील लोकांशी वैचारिक नाळ जुळवून ठेवण्याचे सामर्थ्य लाभणार आहे. राष्ट्रीय सेवा योजना शिबिरांमध्ये सकाळच्या पहिल्या सत्रात श्रमसंस्कार केले जातात. ज्यांनी कधीही आपल्या हातामध्ये पूर्वी कुदळ, फावडे घेतले नव्हते. ज्यांनी कधीही आयुष्यामध्ये कष्ट काय आहे हे अनुभवले नाही. बघितले नाही. या सर्वांना स्वतःच्या हातात कुदळ फावडे घेऊन स्वतःवर श्रमसंस्कार करून घेण्याची संधी प्राप्त होत असते. या श्रमसंस्कार यज्ञातून विद्यार्थी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वावर श्रमाचे संस्कार करून घेतात. सुरुवातीला नाही हो,हो नाही करीत ते स्वतः आवडीने पुढाकार घेतात. या श्रमसंस्कारातून त्यांना कष्टकऱ्यांच्या वेदना, कष्टकऱ्यांच्या समस्या, कष्टकऱ्यांच्या अडचणी समजायला भावी जीवनामध्ये मदत होते. दुसऱ्या सत्रामध्ये बौद्धिक विचार युवकांच्या मनामध्ये पेरले जातात. देशातील विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा विविध प्रश्नांवर आधारित मुद्द्यांवर आधारित त्या त्या क्षेत्रातील नामवंत वक्त्यांचे बौद्धिक यावेळी आयोजित केले जाते. या बौद्धिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर वैचारिक संस्कार केले जातात. या माध्यमातून विद्यार्थ्यांची वैचारिक जळण-घडण होते. ज्या गोष्टीचे ज्ञान नाही, ज्या गोष्टी कधीही ऐकल्या नाही अशा अनेक गोष्टी बौद्धिक सत्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कानावर जातात. यातून खेड्यातील प्रश्नांवर तोडगे समजायला लागतात. वर्गातील चार भिंतीच्या आड या विषयावर कधीही चर्चा होत नसल्याने जे विषय कधीही चर्चिले जात नाही अशा विषयांवर या सेवा योजना शिबिरामध्ये बौद्धिके ऐकायला मिळते. त्यातून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक उंचीचा दर वाढत असतो. रात्री सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांतील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी एक सुवर्णसंधी असते. जो विद्यार्थी आयुष्यात कधीही व्यासपीठावर गेला नाही. जो विद्यार्थी कधीही आयुष्यात स्टेजवर गेला नाही. ज्या विद्यार्थ्यांनी कधीही आयुष्यात भाषण दिले नाही. अशा सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांना सक्तीने का होईना सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घ्यावा लागतो. या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी सुरुवातीला भीतभीत का होईना रंगमंचावर चढतात. हळूहळू त्यांच्यातील हिम्मत वाढवून अंगीभुत गुण वाढवून ते हळूहळू उच्च दर्जाचे कलाकार होतात. त्यांच्यात सभा धारिष्ट्य येते. या सात दिवसाच्या कालावधीत त्यांच्यावर झालेले शारीरिक, बौद्धिक, सांस्कृतिक संस्कार हे पुढे त्यांना आदर्श नागरिक म्हणून जगण्यासाठी सहाय्यभूत ठरतात. हे सात दिवसीय राष्ट्रीय सेवा योजना शिबिर त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाची शिदोरी ठरते. नॉट मी बट यु 'माझ्यासाठी नव्हे तर तुमच्यासाठी' हे राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रीद आहे. आपले उज्वल भवितव्य गाठत असतानाच समाज व राष्ट्राला आपण काही देणे लागतो म्हणून फूल ना फुलाची पाकळी या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना शिबिर विद्यार्थ्यांवर संस्कार करण्याचे काम करतात. राष्ट्रीय सेवा योजनेच्या बोधचिन्हाप्रमाणे आजचा स्वयंसेवक हा बोधचिन्हाच्या आठ आरेनुसार अष्टप्रहर समाजसेवेसाठी बांधील आहे. लाल रंग हे तारुण्याचे सळसळते रक्ताचे प्रतिक हे राष्ट्र उभारणीसाठी असल्याचे दिसून येते.

अलीकडच्या काळामध्ये समाजातील विविध विचित्र घटना आपल्या दृष्टीक्षेपात येतात. रोज वर्तमानपत्रे उघडले, टीव्हीवरील बातम्या सुरू केल्या की, विचित्र प्रकारच्या घटना आपल्याला लक्षात येऊन राहिल्या आहे. हे सगळे बघता आजचा तरुण कुठे चालला? तो कुठे भटकत तर चालला नाही ना? अशी शंका यायला लागलेली आहे. अशा दिशाहीन झालेल्या, भरकटलेल्या तरुणांना राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून राष्ट्र प्रेमाच्या कंकणात एकत्र बांधण्याचे काम केल्या जात आहे.

# अंधारातून उजेडात नेणारा सन्मार्गी

**घेतलेल्या शिष्यत्वाच्या परीक्षेत आबाजी उत्तीर्ण झाले. म्हणून गुरू माणिकबाबांनी त्यांना अनुग्रह दिला आणि गुरूपदेश केला. नंतर गुरूंनी त्यांचे नाव भगवान ठेवले. त्यांचे पुण्यस्मरण करून श्रीकृष्णदास निरंकारी- बापू यांनी लेखरूपाने लिहिलेली ही रोचक माहिती** संपादक

संतश्रेष्ठ भगवानबाबांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात कीर्तनाच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक, नैतिक व सांस्कृतिक प्रबोधन केले. भक्तिमार्ग, कर्ममार्ग व ज्ञानमार्ग यांचा त्रिवेणी समन्वय त्यांनी साधला होता. तो त्यांच्या कीर्तनातही दिसून येई. कीर्तनकार म्हणून त्यांना प्रचंड लोकप्रियता मिळाली होती. आपल्या कीर्तनांतून ते जातिभेद, धर्मभेद, अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट रुढी-परंपरा यांच्यावर प्रहार करीत. प्रबोधन कार्यासाठी त्यांनी मराठवाडा, विदर्भ, तेलंगाणा, आंध्रप्रदेश, कर्नाटकातील काही भाग व पश्चिम महाराष्ट्रासह उभा महाराष्ट्र पिंजून काढला. विठूनामाचा प्रचार करतानाच त्यांनी समता, बंधुता, एकता, मानवता यांसारख्या आधुनिक विचारांचा आयुष्यभर प्रचार केला. त्यामुळेच वारकरी संप्रदायाला आधुनिक रूप देणारे संत म्हणून त्यांना ओळखले जाते. त्यांनी वार्षिक नारळी सप्ताहाची स्थापना केली.

आबाजींचे पूर्वज हे लहानपणापासून नारायणगडाचे उपासक होते. तेथील महंत हे त्यांचे वंशपरंपरागत गुरू होते व तत्कालीन गादीवर माणिकबाबा होते. आबाजींचे आईवडील नेमाने माणिकबाबांच्या दर्शनासाठी नारायणगडावर येत. एकदा आईवडील त्यांना घेऊन विजयादशमीच्या दिवशी तेथे आले. आबाजींनी माणिकबाबांना गुरूपदेश द्या असे म्हटले. त्यावर अल्पवयात गुरूपदेश देता येत नाही असे माणिकबाबा म्हणाले. पण त्यांच्या मनाचे समाधान झाले नाही. घेतलेल्या शिष्यत्वाच्या परीक्षेत आबाजी उत्तीर्ण झाले. म्हणून माणिकबाबांनी त्यांना अनुग्रह दिला आणि गुरूपदेश केला. नंतर गुरूजींनी त्यांचे नाव भगवान ठेवले. असे म्हटले जाते, की पंढरपुरला गेल्यानंतर तेथेच त्यांची भेट नारायणगड येथील माणिकबाबांशी झाली व ते सांप्रदायिक शिक्षणासाठी नारायणगडी गेले. माणिकबाबा हे त्यांचे गुरू होय. त्यानंतर भगवानबाबा पुढील शिक्षणासाठी आळंदीतील बंकट स्वामी यांच्याकडे गेले. त्यानंतर ते पुन्हा नारायणगडावर आले. त्यावेळी भगवानबाबांचे वय २१ वर्षे होते. त्यानंतर भगवानबाबा नारायणगडाचे महंत झाले व त्यांनी तेथे वारी, नारळी सप्ताह असे अनेक धार्मिक कार्यक्रम राबवले.



श्री संत भगवानबाबा

बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यांत सुपेघाट सावरगाव येथे श्रावण वद्य पंचमी शके १८१८ म्हणजेच दि.२९ जुलै १८९६ रोजी संतशिरोमणी भगवानबाबा यांचा जन्म झाला. बारशाच्यावेळी मुलाचे नाव आबा किंवा आबाजी ठेवण्यात आले. त्यामुळे भगवानबाबांचे पूर्ण नाव आबाजी तुबाजी सानप होते. ते कौतिकाबाई आणि तुबाजीराव यांचे पाचवे अपत्य होते. सावरगावात चौथीपर्यंत शाळा होती. तेव्हा गुरुजींच्या सांगण्यावरुन पुढील शिक्षणासाठी त्यांना त्यांच्या मामाच्या गावी लोणी, ता.शिरूर, जि.बीड येथे पाठवले गेले. अधिक शिक्षणसोयी नसल्याने आबाजी पुन्हा गावाकडे परत आले. ग्रामीण भागात रीती रिवाजानुसार गुरेढोरे राखायला ते जात असत. आबाजीला शेती व गुरांची निगराणी राखायला फार आवडत असे. घरात धार्मिक वातावरण असल्यामुळे उपजतच त्यांना अध्यात्माची व विठ्ठलनामाची आवड निर्माण झाली. ते घरी शेतीकाम सांभाळून विठ्ठलभक्ती करत असत. त्यांनी पंढरपूर दिंडीत जाण्यास सुरुवात केली. दिघूळ येथील प्रख्यात वारकरी गितेबाबांसोबत ते प्रथम दिंडीस गेले. पंढरपूरच्या विठ्ठलाचे दर्शन झाले तर जीवनाचे कल्याण होते, अशी त्यांच्या परिवारात आणि आसपासच्या समाजात समजूत होती. त्यामुळे त्यांनी गीतेबाबा दिघुळकरांसोबत पंढरपूरची वारी केली. त्यासाठी ते वयाच्या ५-६व्या वर्षी घर सोडून पायी चालत गेले. पहिल्या वारीच्या शेवटीच तेथे पोहोचल्यावर त्यांनी संपूर्ण जीवन विठ्ठलचरणी अर्पण केले. त्यांनी गीतेबाबांनाच आध्यात्मिक गुरू मानले. पंढरपूरच्या वारीवरून गावी परतल्यावर आबाजी घरी परत गेले नाही. गावातील हनुमान मंदिरात जाऊन बसले. घरच्यांना ही बातमी कळताच ते मंदिरात आले. तेव्हा त्यांनी तुळशीमाळ घालण्याचा आग्रह केला. लहान आबाजींचे भगवंताविषयी असलेले प्रेम पाहून घरच्यांनी आग्रह स्वीकारला. तेव्हाच ते घरी परत आले.

अनेक वर्षे बाबांची कीर्तन कारणाने भ्रमंती सुरू असताना त्यांनी समाजाचे जवळून निरीक्षण केले, अभ्यास केला. समाजाचे विदारक चित्र पाहून त्यावर बाबांनी कीर्तनाद्वारे समाजप्रबोधन केले. समाजातील अनेक वाईट प्रथा व चालीरीती बंद करण्याचा प्रयत्न केला. अंध:कारातून प्रकाशाकडे जाणारा मार्ग बाबांनी सांगितला. इ.स. १९६५ च्या प्रारंभी भगवानबाबांची प्रकृती खालावत चालली होती. अनेक दिवसांपासून त्यांच्या प्रकृतीत चढ उतार होत होते, त्यांची प्रकृती आणखी खालावली व प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना पुणे जिल्ह्यातील रुबी हॉल क्लिनिक येथे औषधपाण्याकरिता दाखल केले. संतश्रेष्ठ भगवानबाबा हृदयविकाराने आजारी असताना उपचार करण्यासाठी रुबी हॉल क्लिनिक इस्पितळातील डॉ.के. बी.ग्रँट व त्यांची टीम दाखल झाली. त्यांच्या विनंतीला मान देऊन नाथा मिसाळ हे ज्ञानेश्वरीचे पारायण करत असत. तेथेच दि.१८ जानेवारी १९६५ रोजी वयाच्या ६९व्या वर्षी समाधीस्थ होऊन जगाचा निरोप घेतला. तीन वेळा त्यांनी पुंडलीक वरदा हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय, जगद्गुरू तुकाराम महाराज की जय, शांतिब्रह्म श्री एकनाथ महाराज की जय! असा जयघोष करून आत्मा पांडुरंगचरणी विलीन केला व देह ठेवला. !! भगवान बाबांना त्यांच्या पावन पुण्यस्मरण पर्वावर विनम्र अभिवादन !!

**- संत चरणधूळ -**
**श्रीकृष्णदास निरंकारी- बापू.**
**मु. पोटेगावरोड, पॉवर हाऊसच्या मागे, गडचिरोली.**
**पो. ता. जि. गडचिरोली, भ्रमणध्वनी- ७७७५०४१०८६.**

# मराठी प्राध्यापक परिषदेचे अधिवेशन १९ व २० जानेवारीला




**नागपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली मराठी प्राध्यापक परिषदेचे ३४ वे अधिवेशन स्थानिक डॉ. मधुकरराव वासनिक पी डब्ल्यू एस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथे आयोजित करण्यात आले आहे. १९ व २० जानेवारी २०२४ रोजी आयोजित या दोन दिवसीय ज्ञानवर्धिष्णू अधिवेशनात विविध बौद्धिक परिसंवादांचे आयोजन करण्यात आले आहे.दि. १९ जानेवारी शुक्रवारी सकाळी ११ वाजता उद्घाटन समारंभ होईल . यावेळी उद्घाटक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ . संजय दुधे असतील. प्रमुख अतिथी ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक डॉ. सुधीर रसाळ, स्वागताध्यक्ष पीपल्स वेल्फेअर सोसायटी नागपूरचे अध्यक्ष डॉ. मधुकरराव वासनिक, उद्घाटनाध्यक्ष प्राचार्य डॉ. यशवंत पाटील, अधिवेशनाध्यक्ष डॉ. राजेंद्र नाईकवाडे, मराठी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष डॉ. गणेश मोहोड , सचिव डॉ. राजेंद्र वाटाणे,पीपल्स वेल्फेअर सोसायटी नागपूरचे सचिव ड. मोहन वासनिक, सहसचिव मनोज वासनिक, पूर्वाध्यक्ष प्रा. श्रीकांत नाकाडे प्रामुख्याने उपस्थित असतील. यावेळी अधिवेशनाचे सर्व पूर्वाध्यक्ष आणि सेवानिवृत्त प्राध्यापकांचा सत्कार तसेच विविध ग्रंथांचे प्रकाशन करण्यात येईल.दुपारी २ वाजता पहिले सत्र 'वैदर्भीय साहित्य आकलन आणि आस्वाद ' या विषयावर होईल. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.अजय चिकाटे राहणार आहेत. यावेळी वक्ते डॉ. जयश्री शास्त्री (वैदर्भीय कविता), डॉ. नरेंद्र घरत (वैदर्भीय कथा), डॉ.माधव कांडणगिरे (वैदर्भीय कादंबरी), डॉ. जयश्री सातोकर (वैदर्भीय नाटक) या विषयांवर मार्गदर्शन करतील. सायंकाळी ४ वाजता दुसरे सत्र 'प्रसार माध्यमे आणि मराठी साहित्य' या विषयावर होईल. या सत्राचे अध्यक्षस्थानी डॉ. हेमचंद दुधगवळी असतील. यावेळी डॉ.गणेश चव्हाण (वाङ्मयीन नियतकालिके आणि मराठी साहित्य), डॉ. राजेश देशपांडे (दृकश्राव्य माध्यमे आणि मराठी साहित्य), डॉ. नरेंद्र आरेकर (चित्रपट आणि मराठी साहित्य), डॉ. रामलाल चौधरी (वृत्तपत्र आणि मराठी साहित्य) या विषयांवर विवेचन करतील. रात्री सायंकाळी ७ वाजता प्राध्यापकांसाठी संगीत रजनी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात प्राध्यापक मंडळी आपल्या सुप्त कलागुणांना प्रस्तुत करतील. २० जानेवारी शनिवारला सकाळी १० वाजता 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वाङ्मयीन योगदान' या विषयावर तिसरे सत्र होईल. या सत्राच्या अध्यक्षस्थानी नागपूर येथील प्रसिद्ध समीक्षक डॉ. शैलेंद्र लेंडे राहणार आहेत. या सत्रात वक्ते डॉ.भारती खापेकर (निबंध वांग्मय), डॉ .प्रमोद नारायणे (वैचारिक वांग्मय), डॉ. विनोद राऊत (भारतीय राज्यघटना), डॉ .देवमन कामडी (पत्रकारिता आणि साहित्य) या विषयांवर मार्गदर्शन करतील. दुपारी सकाळी ११.३० वाजता या अधिवेशनाचे चौथे सत्र खुले अधिवेशन सुरू होईल. या खुल्या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी मराठी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष डॉ. गणेश मोहोड राहतील. यावेळी कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. हिराजी बनपूरकर ,सचीव डॉ. राजेंद्र वाटाणे, कोषाध्यक्ष डॉ. सोपानदेव पिसे इत्यादी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित राहतील. दुपारी १२.३० वाजता या अधिवेशनाचे समारोपीय शेवटचे सत्र होईल. या सत्राच्या अध्यक्षस्थानी अधिवेशनाध्यक्ष डॉ. राजेंद्र नाईकवाडे राहणार आहेत. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उच्च शिक्षण विभागाचे नागपूर येथील सहसंचालक डॉ. संतोष चव्हाण, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय वाटमोडे, डॉ. शंकर बागडे, पुरोगामी विचारवंत डॉ. इंद्रजित ओरके, प्राचार्य डॉ. यशवंत पाटील, मनोज वासनिक प्रामुख्याने उपस्थित राहतील. या सत्रात गोंडवाना विद्यापीठ आणि रातुम नागपूर विद्यापीठातील आचार्य पदवी प्राप्त आणि विशेष पुरस्कार प्राप्त प्राध्यापकांचा गौरव करण्यात येणार आहे. दोन्ही दिवस चालणाऱ्या या प्राध्यापक परिषदेच्या विविध कार्यक्रमांस व अधिवेशनास दोन्ही विद्यापीठातील मराठी विषयाच्या सर्व प्राध्यापकांनी आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. यशवंत पाटील, मराठी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष डॉ. गणेश मोहोड, कार्याध्यक्ष डॉ. हिराजी बनपुरकर, सचिव डॉ. राजेंद्र वाटाणे, या अधिवेशनाच्या संयोजक डॉ. मनीषा नागपुरे, सहसंयोजक डॉ. अमृता डोर्लीकर इत्यादींनी केले आहे.

# मराठीच्या अध्यापकाने व्यासंगी, बहुश्रुत, अद्ययावत आणि युगानुकूल असावे - डॉ.राजेंद्र नाईकवाडे

**सुप्रसिद्ध साहित्यिक, समीक्षक, रा.तु म.नागपूर विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष आणि श्री बिंझाणी नगर महाविद्यालयातील मराठीचे प्राध्यापक डॉ.राजेंद्र नाईकवाडे हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व गोंडवाना विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या ३४ व्या अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविणार असून नागपूरच्या डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस. महाविद्यालयात दि. १९ व २० जानेवारी २०२४ हे अधिवेशन होत आहे. या निमित्ताने डॉ. राजेंद्र नाईकवाडे ह्यांच्या मुलाखतीच्या माध्यमातून त्यांच्या अध्यापकीय कारकीर्दीचा आणि त्यांच्या साहित्यविषयक व अध्यापनविषयक दृष्टीचा वेध घेतला आहे श्री बिंझाणी नगर महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्रमुख डॉ. नरेंद्र घरत यांनी.**

**प्रश्न : सर, सर्वप्रथम आपले मनापासून अभिनंदन! अलीकडेच आपल्याला संस्कार भारतीचा वाङ्मय पुरस्कार मिळाला आणि सोबतच आपली मराठीच्या अध्यापनक्षेत्रातील या एका महत्वपूर्ण व्यासपीठाचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. सर, आपल्या सुरुवातीच्या जीवनासंबंधी म्हणजे, जन्म, बालपण व शालेय शिक्षण याविषयी थोडक्यात सांगावे.**

**उत्तर:** आमचं मूळ गाव म्हणजे नागपूर- चंद्रपूर रस्त्यावरील उमरेड तालुक्यातील बेला हे वेणा नदीच्या काठावर वसलेलं गाव! आमच्या आजोबांची मोठी शेती त्या गावात होती. ते गाव दत्तजयंतीला भरणाऱ्या घोड्याच्या यात्रेसाठी प्रसिद्ध! त्या यात्रेदरम्यान त्या काळात तंबूच्या थिएटरमध्ये पाहिलेले अनेक हिंदी चित्रपट अजूनही माझ्या स्मरणात आहेत. माझे वडील गोविंदराव आणि काका जगन्नाथराव हे नागपूरच्या चोळकरांच्या अनाथ विद्यार्थीगृहाचे विद्यार्थी! अनाथ नसले तरी शिक्षणासाठी ते तिथल्या शाळेत शिकले! बाबांचे शिक्षण मॅट्रिक पर्यंत झालेले तर आई देवकी हिचे शिक्षण चौथीपर्यंत. बाबा रेल्वे मेल सर्विस मध्ये सॉर्टर म्हणून नोकरीला होते. त्या काळात माझे बालपण महाल- गांधीबाग भागात गेले. जोध प्राथमिक शाळा येथे चौथीपर्यंत आणि सीपी ॲण्ड बेरार शाळेत पुढे दहावीपर्यंत. बाबांच्या अत्यंत शिस्तप्रिय, सरकारी नोकरीत असूनही सचोटीपूर्ण व प्रामाणिक व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव नक्कीच कुठेतरी आम्हा साऱ्या भावंडांवर पडला! बडे बाबू म्हणून त्यांच्या मित्रांत परिचित, नेटके आणि वळणदार अक्षर असणारे, पांढरी टोपी आणि धोतर-सदरा यात वावरणारे, अखंड पायी भ्रमंती करणारे, नित्यनेमाने डायरी लिहिणारे, वृत्तपत्रांचे व पुस्तकांचे सतत वाचन करणारे, नातेवाईकांकडे आणि मित्रांकडे भेटी देणारे, साऱ्यांच्या मदतीला सदैव धावून जाणारे, निरागस निर्मळ आणि भाबड्या मनाचे आमचे बाबा माझे एक आदर्श होते. माझ्या प्रेमविवाहाचा थोडासा त्यांच्यासाठी मनस्तापाचा ठरलेला काळ वगळता सदैव मला ते एखाद्या उत्तुंग आदर्शाप्रमाणेच भासत आले! मला वाटते माझ्या व्यक्तिमत्त्वावर सर्वाधिक प्रभाव जर कुणाचा पडला असेल तर तो त्यांचाच! माझे बालपण अतिशय मजेत गेले. खूप खेळण्यात आणि खूप दंगामस्ती करण्यात ते व्यतीत झाले. विशेषतः पाचवी ते दहावी आणि नंतर बीएससी पर्यंत मी अक्षरशः एखाद्या उनाड उधळलेल्या वारूप्रमाणे मित्रांसोबत अस्ताव्यस्तपणे, मनस्वीपणे, मनसोक्तपणे हुंदडण्यात बागडण्यात माझा अधिकाधिक वेळ घालवला! आईबाबांची घरातील शिस्त, मोठ्या भावाचा मार्गदर्शक वरदहस्त, बहिणीची निरामय माया आणि सीमाचे प्रेमळ दिशादर्शन नसते तर मी आज जिथे आहे तिथे कधीच नसतो ! दरम्यानच्या काळात माझे मोठे बंधू प्रकाश नाईकवाडे यांचे बोट धरून चित्रकला, साहित्य, संस्कृती, वाचन, संघाची शाखा, चित्रपट इत्यादी विविध क्षेत्रात त्यांच्या मागे मागे फिरण्यात माझे आयुष्य व्यतीत झाले! तुम्ही होते रामाराजा, आम्ही वानरांच्या फौजा तशीच माझी त्याकाळी त्यांच्या विषयीची भावना होती! माझ्या तरुणपणात माझ्या वेड्यावाकड्या भरकटलेल्या शैक्षणिक वाटचालीत तो सदैव भक्कमपणे माझ्या प्रत्येक निर्णयाच्या पाठीशी उभा राहिला आणि माझ्या अत्यंत मनस्वी स्वभावाला कुशलतेने सांभाळत, प्रोत्साहन देत भरकटलेल्या नौकेचे तारू होऊन त्याने ती मुख्य प्रवाहात आणली! आज जे काही माझे यश आहे माझी जी काही वाङ्मयीन क्षेत्रात थोडीफार प्रगती झालेली दिसते, ती माझ्या कुटुंबातील ह्या व्यक्तिमत्वांनी भवताली एक प्रेमाचा भक्कम परकोट केल्यानेच!

**प्रश्न : सर, तुम्ही विज्ञान शाखेकडून कला शाखेकडे कसे वळलात?**

**उत्तर :** मी ८२ चा मॅट्रिक! त्या काळात प्रथम श्रेणी म्हणजे विज्ञान विषय घ्यायचा अशी पद्धत! बी.एफ.ए. करायची इच्छा शालेय चित्रकला परीक्षेत सी ग्रेड मिळाल्याने पूर्ण होऊ शकली नाही व फारशी इच्छा नसतानाही बी.एससी.साठी प्रवेश घेतला. बी.एससी.त अगदी काठावर द्वितीय श्रेणी मिळाल्याने पुढील वाटचालीवर प्रश्न निर्माण झाला! त्या काळात विविध वृत्तपत्रातून विविध विषयांवर लेखन सुरू होतेच! काका डॉ. जगन्नाथ नाईकवाडे मराठीचे प्राध्यापक व लेखक! सीमाने त्यावेळी इ.च.उ.(पत्रकारिता पदवी) ला प्रवेश घेण्यास सुचविले सोबतच साहित्याच्या वेडाने मी मराठी साहित्यात बी.ए.(अतिरिक्त) करायचे ठरविले. एम.ए.मराठी प्रथम वर्ष खासगीरीत्या केल्यावर काकांच्या आग्रहाखातर द्वितीय वर्षासाठी सी.पी.अँड बेरारला प्रवेश घेतला आणि मग जीवनाचा खरा मार्ग गवसल्याचे लक्षात आले! त्याच साहित्यप्रेमाच्या प्रभावाखाली त्या काळी मिळालेली आणि खूप महत्त्वाची मानली जाणारी रेल्वे टी.टी.ची नोकरीही सोडली!(मात्र पुढे अनेक वर्ष स्थायी नोकरीसाठी दीर्घकालीन संघर्ष करावा लागला!)

**प्रश्न : सर, अध्यापन क्षेत्रात कुशल प्राध्यापक आहात. आपण अध्यापक व्हावे असे का वाटले? तुमच्या अध्यापनाच्या कारकिर्दीला सुरुवात कुठून केली?**

**उत्तर :** माझा अध्यापन प्रवास हा १९९३मध्ये एम.ए. आणि एम.फिल.च्या पदव्या प्राप्त केल्यानंतर सुरू झाला. त्यावेळी खरेतर अध्यापनक्षेत्रात मी एक अगदीच नवखा गडी होतो. परंतु एम.ए.-एम.फिल. दरम्यान ज्या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ गुरूंचे मार्गदर्शन मला लाभले आणि अभ्यासू मित्रांच्या सहकार्याने विविध अभ्यासविषयांची टिपणे काढण्याची व आवश्यकतेनुसार अभ्याससामग्री ग्रंथातील झेरॉक्स करून जमविण्याची सवय मला लागली त्यामुळे सुरुवातीला माझा विषय शिकविताना मला थोडेफार दडपण आले, तरी त्यातून मिळत असलेला वाङ्मयीन आनंद मला नवी उमेद आणि नवा मार्ग दाखविणारा ठरला. माझ्या अध्यापनाचा आरंभबिंदू भोपाळच्या अत्यंत निसर्गरम्य अशा श्यामला हिल्स परिसरातील रीजनल कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या कमी विद्यार्थ्यांच्या वर्गखोल्या ठरला! भोपाळचे प्रसिद्ध कवी मा. गो. जामदार आणि सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. चंद्रकांत पांढरीपांडे व प्रसिद्ध संघकार्यकर्ते डॉ. लक्ष्मणराव जोशी व सौ. सुस्मिता जोशी इत्यादींचा प्रेमळ सहवास व प्रोत्साहन तिकडे आम्हा उभयतांना लाभले! अशी सखोल व निर्व्याज जिव्हाळ्याने काठोकाठ भरलेली माणसे मला जीवनाच्या विविध वळणांवर भेटत राहिली, म्हणूनच जीवनात वर उचलून धरणारा गोतावळा साठत गेला! काफिले आते गए कारवाँ बनता गया! त्यावेळी माझ्या अध्ययन-अध्यापनाला असलेली 'बडा तालाब'च्या काठावरची निसर्गरम्य आणि भारतभवनसारख्या जगविख्यात केंद्राची साहित्यरम्य पार्श्वभूमी महत्त्वाची ठरली. सोबतच एनसीईआरटीच्या त्या महाविद्यालयात कार्यरत आपापल्या क्षेत्रातील तज्ज्ञ आणि गणमान्य मंडळींचा सहवास, तासंतास विविध पुस्तकांच्या वाचनासाठी ग्रंथालयात घालविलेले क्षण, या साऱ्यामुळे अध्यापनाचा तो प्रारंभकाळ निवांत अभ्यासाची संधी देणारा ठरला. तो एकच सत्राचा छोटा काळ असला, तरी माझ्या पुढील तीन दशकांच्या अध्यापनसेवेचा पाया त्या हिंदी-मराठीच्या संमिश्र संस्कारातून व्यापक आणि अधिक सघन स्वरूपाचा होत गेला, असे आज इतके वर्षांनी मागे वळून बघताना प्रकर्षाने जाणवते.

**प्रश्न : सर तुम्ही बरेच वर्षे अंशकालीन पद्धतीनुसार काम केले व नोकरीसाठी बराच काळ संघर्ष केला? तुमच्या हा स्ट्रगल पिरेडविषयी सांगा काही!**

**उत्तर :** माझ्याइतके दीर्घकाल अस्थायी पद्धतीने अध्यापन केलेले मराठीचे प्राध्यापक विरळाच असतील! २००४ मध्ये वयाच्या ३७ व्या वर्षी मी आमच्या आदरणीय जोगसरांच्या आस्थेने आणि कृपेने स्थायी प्राध्यापक पदावर सीपीबेरार मध्ये रुजू झालो. त्यापूर्वी १९९३ मध्ये एम. फिल. व 'नेट(ळींह गठऋ) झाल्यावर १०-११ वर्षे विविध महाविद्यालयात अंशदायी म्हणून भटकंती केली. भटकत फिरलो भणंग आणिक मिळेल तेथे पाणी प्यालो जुळेल तेथे खूण जुळवली तरि होतो हा तसाच उरलो किंवा अस्थाईवर स्थायिक झालो चुकून गेला पहा अंतरा; ओरडून का अता लागणे ढिल्या गळ्यावर पंचम गहिरा!



त्यामुळे अगदी कमालीचे निराश होईपर्यंत बेरोजगारी अनुभवली. मधल्या काळात भाऊंच्या मदतीने संगणक युनीट घेऊन संगणकाचे शिकवणीवर्ग(सौ.सीमा) आणि डीटीपी व इतर छपाईची कामे केली. त्यापूर्वी बी.एम.सी. केल्यावर १९८९ ते १९९२ पत्रकारितेत(जनवाद, नागपूर पत्रिका, तरुण भारत) उमेदवारी केली होती! तिचे रूपांतर पुढे विविध वृत्तपत्रातील सातत्यपूर्ण लेखनकार्यात झाले. 'घाटघाटचे पाणी' पिण्याचा अनुभव मात्र वाया गेला नाही, तर समृद्ध व बहुआयामी करून गेला! पुढे जोगसरांच्या आशीर्वादाने सी.पी.अँड बेरार हीच माझी कर्मभूमी बनली! रिसर्च फेलो असताना आणि तिथून निघाल्यावर पुढील कुलकर्णी-काळे सरांच्या काळात विद्यापीठाच्या स्नातकोत्तर विभागातही अध्यापनाची संधी मिळाली, तिने मला घडविण्यात मोलाचा वाटा उचलला.

**प्रश्न: तुमच्यातल्या उदारता व स्पष्टवक्तेपणा ह्या गुणधर्माविषयी काय सांगू इच्छिता?**

**उत्तर :** माझ्यात खरेच सर्वार्थाने उदारता वगैरे आहे की नाही माहिती नाही, पण खूप विविधांगी मित्रमंडळांसोबत बाल-तरुण वयाचा काळ घालविल्याने आणि बाबा-भाऊंच्या व संघशाखेच्या संस्कारांनी ही उदारता कदाचित व्यक्तिमत्त्वात भिनली असावी! ज्या स्पष्टवक्तेपणामुळे माझ्याकडून अनेक माणसे दुखावली गेली आणि काही दुरावरी सुद्धा त्याला गुण म्हणायचे की दोष हा प्रश्न पडतो! पण ह्या परखडपणाचा काही एक लाभ समीक्षालेखनात झाला! ती अधिक पारदर्शक आणि अधिक वस्तुनिष्ठ झाली ती अंगभूत स्पष्टवक्तेपणामुळे! एका विशिष्ट आग्रही दृष्टिकोनामुळे तिला धार आली, वेगळेपणा आला! बरेचदा माझी 'टीका' हिन्दी अर्थाने उत्तम व मराठी अर्थाने दोषपूर्णही झाली असावी या स्पष्टोक्तीपूर्ण स्वभावाने! अर्थात ह्याचा अतिरेकही झाला बरेचदा व वैयक्तिक जीवनात नुकसानही झाले! पण आप्तमित्रांनी खूप सांभाळून घेतले ही खरेतर त्यांची उदारता!

**प्रश्न : सर, आवडता साहित्यप्रकार कोणता?**

**उत्तर :** माझे आवडते साहित्यप्रकार तीन! कविता, कादंबरी आणि ललितबंध! त्यातही पहिले व गहिरे प्रेम म्हणजे कविता! अगदी शालेय जीवनापासून मी कविता केल्या आणि मराठी कवितेची मोहिनीही अनुभवली. पुढे समीक्षेसाठी विशेषत्वाने हाच आकृतिबंध अधिक भावला. माझ्या 'राजसी' या प्रेमपत्रसंग्रहात जवळपास २५-३० पत्रे काव्यरूपात आहेत! अजूनही काव्यलेखन होते तुरळक, पण स्वान्तःसुखाय! काव्यसमीक्षा हा तर जीवनाचा एक अविभाज्य भाग झाला कालांतराने!

**प्रश्न: मराठी प्राध्यापक परिषद संघटनेचे कार्यवाह हे पद आपण निष्ठेने सांभाळले. मराठी प्राध्यापक परिषदेच्या वाटचालीबद्दल आपणास काय वाटते?**

**उत्तर :** आपली मराठी प्राध्यापक परिषद ही संपूर्ण महाराष्ट्रातील, मराठी समाजातील एक युनीक अशी, विशेष अशी मराठीच्या प्राध्यापकांची संघटना आहे. तिची आजवर झालेली ३० वर अधिवेशने आणि त्यानिमित्ताने घडून येणारे प्राध्यापकांतील विचारांचे आदानप्रदान, हेच परिषदेच्या यशाची व सार्थकतेची कहानी सांगण्यास पुरेसे आहे. आपल्या गुरुजनांच्या पावलांवर पावले टाकत सहजपणेच माझा परिषदेच्या प्रत्यक्ष कामात प्रवेश झाला आणि ह्या विधायक कामात मी आनंदाने स्वतःस गुरफटून टाकले. कुठल्याही कामाचा आपल्याला फायदाच होतो की आपल्या मनाला, व्यक्तित्वाला, वाणीला, लेखनीला धार लागत राहते! 'एकमेकां साह्य करू अवघे धरू सुपंथ' हे वचन सार्थ होत राहते!

**प्रश्न: तुमची प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष म्हणून एकमताने निवड झाली तेव्हा तुम्हाला कसे वाटले?**

**उत्तर :** या निवडीमुळे मला आनंद झाला, आजवरच्या कामाचीच जणूकाही एक चांगली फलश्रुती घडूध आल्याचे समाधान लाभले! पण सोबतच एका मोठ्ठ्या जबाबदारीचा भारही खांद्यावर आपल्यासारखे वाटले! आपण काय सांगणार लोकांना अध्यक्षीय भाषणातून ? असा प्रश्न पडला! पण लक्षात आले की, आपण आजवर जे बोलत आलो, लिहित आलो, जगत आलो, अध्यापक म्हणून, तेच अनुभव, तोच दृष्टिकोन तर नव्याने मांडायचाय!

**प्रश्न : सर, तुमचे ललितलेखन म्हणून 'राजसी' हा एकच प्रेमपत्रांचा संग्रह प्रकाशित झाला! बाकी तुम्ही मुख्यतः समीक्षाच लिहिली! आज तुम्ही महाराष्ट्रातील एक नामवंत समीक्षक आहात. तुमच्या समीक्षालेखनाला सुरुवात कधी झाली?**

**उत्तर :** खरं पाहता, माझ्या लेखनाची सुरुवात वृत्तपत्रातील, विशेषतः तरुण भारत मधील 'वाचकांची पत्रे' यातून झाली! विविध विषयांवर खूप पत्रे मी लिहायचो. सोबतच माझा एक खूप आवडीचा विषय म्हणजे सिनेमा! त्यावरही मी लिहू लागलो! बीएस.सी. प्रथम वर्षात असताना 'वास्तववादी चित्रपट' हा माझा पहिला लेख तरुण भारतात १९८५ मध्ये प्रसिद्ध झाला! त्यानंतरच्या काळात १९८९ मध्ये 'जनवाद' मध्ये उपसंपादक पदावर रुजू झाल्यावर तिथे 'तारांगण' नावाचा सिनेमावरील स्तंभ लिहिण्याची संधी मिळाली. त्यात १९९० ते १९९१ या काळात मी हिंदी चित्रपटसृष्टीतील अनेकांची व्यक्तिचित्रे रेखाटली. पुढे १९९५ मध्ये तरुण भारतात सिनेमावरील 'उजाळा' आणि दूरचित्रवाणीवरील 'रूपवाणी' या सदरांतून भरपूर लेखन केले. वाङ्मयीन समीक्षा म्हणता येईल अशा एका टिपणवजा लेखाला( 'शिवा राऊत यांची कविता') १९९५ मध्ये वामनराव तेलंग यांनी तरुण भारतातून प्रसिद्धी दिली आणि तिथेच बहुधा माझ्यातल्या समीक्षकाचा जन्म झाला असावा असे मी मानतो. त्यानंतर विविध चर्चासत्रांमध्ये निबंधवाचन आणि वृत्तपत्रातून लेखन असा एक दुहेरी समीक्षाप्रवास सुरू झाला जो आजही निरंतरपणे गेली तीन दशके सुरू आहे.

मुलाखतकार

डॉ.नरेंद्र घरत

**प्रश्न : तुमच्या समीक्षालेखनात हिन्दुत्त्ववादी विचारसरणी प्रतिबिंबित होताना दिसते याबाबतीत काय सांगाल?**

**उत्तर :** माझ्या समीक्षालेखनावर हिंदुत्ववादी विचारधारेचा प्रभाव जाणवतो असे म्हणण्यापेक्षा, माझी समीक्षा भारतीय संस्कृती आणि भारतीय धारणा-विचार ह्यांच्या म्हणजे देशीय, भारतीय आणि राष्ट्रीय परंपरांच्या प्रभावाखाली वावरते, असे म्हणणे अधिक योग्य ठरते! माझ्या एकूण समीक्षेला माझ्या भारतीय चिंतनदृष्टीचे अधिष्ठान आहे ही गोष्ट काही प्रमाणात खरी असली तरी वाङ्मयीन कलाकृतींचे आणि व्यक्तिमत्त्वांचे कलाकृतीनिष्ठ आस्वादक मूल्यमापन करण्यावर माझा भर असतो. इतर अनेक राजकीय प्रणालीपिडित समीक्षकांप्रमाणे मी विचारधारांकडून साहित्यकृतीकडे जात नाही, तर उलट माझी समीक्षा साहित्यकृतीच्या मर्मस्थानाभोवती फिरत त्यातले सांस्कृतिक अनुबंध शोधण्याचा प्रयत्न करते! दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्वतःला 'हिंदुत्ववादी' म्हणवून घेणारे जे अनेक वैचारिक गट(विशेषतः मोदीयुगानंतर फुटलेले पेव!) समाजमाध्यमांवर दिसतात त्या सगळ्यांशीच माझे वैचारिक नाते नसते! उदा. पोंक्षेंसारखे गांधीविरोधी गोडसेवादी, कडवे मुस्लिमद्वेष्टे व गांधीद्वेष्टे महासभावादी, पुराणपंथी पोंगापंडित ब्राह्मणवादी, संकुचित विचारांचे काही आर्यसमाजवादी इत्यादिंचे कथित हिंदुत्व आणि माझे संघप्रणित व्यापक व समावेशक हिंदुत्व यात मुलभूत फरक आहे असे मी मानतो! माझ्या हिंदुत्वात महात्मा गांधी ह्या एका स्वदेशीवादी हिंदुत्वनिष्ठ प्रातःस्मरणीय(संघाचे प्रातःस्मरण!) महापुरुषाचाही समावेश आहे ! आणि तो विवेकानंद, लोकमान्य, महर्षी दयानंद, योगी अरविंद, स्वा.सावरकर, डॉ. हेडगेवार, गुरुजी गोळवलकर ह्या हिंदुत्वाच्या विविध आधुनिक भाष्यकारांइतकाच महत्त्वपूर्ण आहे ! मी हिंदुत्ववादी असलो तरी, तो भारतीय, देशीय आणि राष्ट्रीय धारणाविचारांचे, विविधरंगी भारतीय साहित्याचे आणि भारतीय संतपरंपरेचे व्यापक अधिष्ठान लाभलेला हिंदुत्ववादी आहे हे कृपया आपण लक्षात घ्यावे.

**प्रश्न : नव्या उमेदीच्या समीक्षकांना तुम्ही काय मार्गदर्शन कराल?**

**उत्तर :** कुठल्याही काळातल्या समीक्षकांनी शक्यतोवर कलाकृतीनिष्ठ, वस्तुनिष्ठ, आस्वादनिष्ठ आणि निरामय वाङ्मयनिष्ठ असावे असे मला प्रामाणिकपणे वाटते. आपले वाङ्मयीन मूल्यमापन जात, प्रदेश, धर्म, पंथ, विचारधारा, राजकीय पक्ष इत्यादींच्या सापेक्षतेने करणे शक्यतोवर टाळायला हवे! तरच ते कलाकृतीला आणि कलावंताला न्याय देऊ शकेल! आपली जातीयता, राजकीय पक्षपाती दृष्टी आणि फुटिरतावादी मानसिकता सामाजिकतेच्या, मानवाधिकाराच्या, सेक्युलॅरिझमच्या बुरख्याआड दडवणारी समीक्षा साहित्यकृतीला झुंडशाहीकडे नेत असते! तिचे खरे, सत्याधिष्ठित, निखळ व निरामय मूल्यांकन ती करू शकत नाही!

**प्रश्न : रिद्धपूर येथे स्थापन होणा-या नव्या मराठी भाषा विद्यापीठासाठी महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या समितीचे आपण एक सदस्य होतात. या विद्यापीठाचे वेगळेपण काय? आणि मराठी समाजाला आणि मराठीच्या विद्यार्थ्यांना याचा कोणता लाभ होणार आहे ? कृपया याविषयीची आपली भूमिका काय ते सांगावे.**

**उत्तर :** रिद्धपूर येथे स्थापन होणा-या नव्या मराठी भाषा विद्यापीठाचा आराखडा तयार करण्याच्या समितीचा मी एक सदस्य असलो तरी या समितीची जी मसुदा उपसमिती होती त्या समितीने विशेषत्वाने हा विद्यापीठ मसुदा तयार केला. त्यामध्ये समितीचे अध्यक्ष ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे, डॉ. रमेश वरखेडे, डॉ. दिलीप धोंडगे, डॉ. अविनाश आवलगावकर ही मंडळी होती. हे नवे विद्यापीठ म्हणजे मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीचे अध्ययन व अध्यापन करणारे जागतिक स्तरावरील एक शिक्षणकेंद्र असावे या दृष्टीने या प्रस्तावित विद्यापीठाची रचना करण्यात आली आहे. या रचनेत ज्या ज्ञानशाखा, त्यांचे जे उपविभाग आणि जी विविध अभ्यासकेंद्रे समाविष्ट करण्यात आली आहेत (महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर या कायद्याचा मसुदा पाहता येऊ शकेल!) ते बघितल्यास या विद्यापीठाचे व्यापक आणि अद्ययावत कार्यक्षेत्र लक्षात येऊ शकेल! यातील विद्याशाखा व विभाग खालीलप्रमाणे -

१. भाषाभ्यास आणि भाषिक अभियांत्रिकी विभाग - अ. भाषा आणि संहिताशास्त्र

भाषेचे तत्वज्ञान, भाषा- व्यवस्था, भाषाकुल अंकल्पना

ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि तौलनिक भाषाविज्ञान

संहिताशास्त्र आणि मराठीतील विविध लिपींचा अभ्यास

ऐतिहासिक पाठ्य/संहिता व अन्य प्राचीन भाषिक साधनांचा अभ्यास मराठी साहित्यातील पौराणिक प्रतिमा, प्राक्कथा, लोकतत्त्वे इ.चा अभ्यास

**आ. भाषिक अभियांत्रिकी आणि संगणकीय भाषाभ्यास**

इ. संज्ञानात्मक व मेंदूसापेक्ष भाषाशास्त्र

ई. समाजभाषाविज्ञान आणि बोलींचा अभ्यास

उ. भाषेचे अध्यापन, प्रशिक्षण व संशोधन

ऊ. भारतीय भाषा आणि परकीय भाषाभ्यास व भाषांतरविद्या

ए. कोशविज्ञान/शब्दकोशशास्त्र

**२. कला आणि साहित्य**

अ. ललित कला, उपयोजित कला, सादरीकरण कला व हस्तकला

आ. अभिजात भाषा आणि प्राचीन-मध्ययुगीन मराठी साहित्य

इ. तत्त्वज्ञान, पौर्वात्य व प्रायोगिक सौंदर्यशास्त्र, शैलीशास्त्र व शब्दार्थज्ञान शास्त्र (क्शीशपर्शीळली)

ई. सर्जनशील व व्यावसायिक मराठी लेखन

**३. महाराष्ट्रीय संस्कृती आणि परंपरा**

अ. महाराष्ट्रीय संस्कृती व सांस्कृतिक अभ्यास

आ. बृद्धमहाराष्ट्रातील मराठीचा अभ्यास

इ. सामाजिक शास्त्रे

**४. आंतरविद्याशाखीय अभ्यास**

अ. पत्रकारिता व जनसंवाद विभाग

आ. वाणिज्य व व्यवसाय प्रबंधन

इ. ग्रंथालय आणि माहितीविज्ञान

याशिवाय विद्यापीठात पुढील सात अभ्यासकेंद्रे स्थापिली जाणार आहेत-

१. ज्ञानसाधने/माध्यमे, भाषांतर आणि भाषिक अन्वयार्थ केंद्र

२. श्राव्य आणि दृक्श्राव्य व संगणकीय साहित्यनिर्मिती केंद्र

३. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती चे आंतरराष्ट्रीय प्रचार-प्रसार केंद्र

४. ग्रंथालय व माहिती केंद्र

५. वस्तुसंग्रहालय व पुरातत्व केंद्र

६. संगणकीय भाषिक प्रयोगशाळा केंद्र

७. मानस - भाषावैज्ञानिक प्रयोगशाळा केंद्र

८. ग्रंथनिर्मिती व ग्रंथमुद्रण सेवा केंद्र

काही मंडळी या संदर्भात जो मराठी माध्यमातून अन्य (मराठी भाषा व साहित्य या शिवायच्या) विद्याशाखांचे शिक्षण देण्यासंबंधीचा मुद्दा मांडत विद्यापीठाला विरोध करीत आहेत, त्यांना बहुधा 'मराठी विद्यापीठाची' खरी कार्यकक्षा काय हे कळलेले दिसत नाही! आज महाराष्ट्रातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयात मराठी माध्यमातून शिक्षण देण्याचे प्रयोग व प्रयत्न सुरू झाले असून त्यासाठीची अध्ययन-अध्यापन सामग्रीही मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहे. अनेक विद्यापीठातून व महाविद्यालयातून विविध ज्ञानशाखांचे शिक्षण मराठी माध्यमातून पूर्वीपासूनच देण्यात येत आहे. नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीनंतर मातृभाषेपासून शिक्षणाचा मुद्दा भविष्यात महत्त्वाचा ठरणारच आहे! परंतु मराठी भाषा विद्यापीठाच्या परिघात तो गैरलागू आहे. जागतिक विद्यापीठातील भाषा-साहित्याचे अभ्यासक्रम आणि भारतातील विविध भाषिक विद्यापीठांचे अभ्यासक्रम यांचा अभ्यास करूनच नव्या मराठी भाषा विद्यापीठाची रूपरेषा शिक्षणतज्ज्ञांनी व भाषा-साहित्यतज्ज्ञांनी तयार केली आहे!

**प्रश्न : मराठी साहित्यातील देशीवाद ही संकल्पना आपणास पटते का? देशीयत्व म्हणजेच भारतीयत्व असे आपण म्हणू शकतो का?**

**उत्तर :** भारतीय साहित्यात अवतीर्ण झालेली देशीवाद किंवा देशीयता ही संकल्पना महत्त्वाची आहे. भारतीय समीक्षेवर असलेला अतिरिक्त पाश्चात्य प्रभाव समाप्त करून तिला भारतीय देशी धारणाविचारांकडे वळविण्याचे लक्षणीय काम या समीक्षाव्यूहाने केले आहे. भारतीय देशी साहित्याचे वाङ्मयीन आणि वैचारिक श्रेष्ठत्व तिच्या देशी मूळांमध्ये, तिच्या सांस्कृतिक व पारंपरिक मुळांमध्ये सामावलेले असते हेच महत्त्वपूर्ण असे वाङ्मयीन सत्य देशीयतानिष्ठ समीक्षा उद्घाटित करते. माझ्या 'देशीयतेचा साहित्यसिद्धांत आणि मराठी कविता' हा युजीसीला सादर केलेला बृहद् संशोधन प्रकल्पाचा काही भाग येत्या काही महिन्यांत 'देशीवाद : नवे परिप्रेक्ष्य' या नावाने विजय प्रकाशन, नागपूर तर्फे प्रकाशित होत असून त्यामध्ये विस्ताराने मी विविध मुद्द्यांवर भाष्य केले आहे.

**प्रश्न: मराठी भाषेचे अस्तित्व टिकविण्यासाठी शासनाची, अध्यापकाची आणि विद्यार्थ्यांची जबाबदारी काय?**

**उत्तर :** सामग्र्याने दायित्वाचा विचार करता ते मराठी ही मातृभाषा असलेल्या संपूर्ण समाजाचे आहे. त्यापैकी दायित्वाच्या स्तरानुसार विचार करता प्रथम दायित्व राजा कालस्य कारणम् या सूत्रानुसार मराठी समाजाचा प्रतिनिधी घटक असलेल्या शासन-प्रशासनाचे असते. त्यानंतर मराठीपजिविए या समाजघटकाचे म्हणजे मराठीचे शिक्षक, प्राध्यापक, मराठीची माध्यमे, विद्यापीठे आणि शिक्षणव्यवहार, साहित्यसंस्था इत्यादिंचे आणि तिस-या स्तरावर दायित्वाचा क्रम लागेल, मराठी भाषेतून संवादव्यवहार व जीवनव्यवहार करणारी सर्वसामान्य मराठी जनता ! ह्या सर्वच घटकांची जबाबदारी परस्परावलंबी स्वरुपाची आहे. एकाच घटकाने जीव तोडून प्रयत्न केल्याने फारसे काही साध्य होणार नाही! परस्परांची सकारात्मक साथ असेल आणि मराठी ही जीवनव्यवहाराचा भाग असेल तर तिचे संरक्षण आणि संवर्धन होत राहील सहज-स्वाभाविकपणे! या संदर्भात सध्याची एकूण परिस्थिती मला स्वतः समाधानकारक व आशादायक वाटते.

**प्रश्न: राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा मराठीचा अभ्यासक्रम अधिकाधिक व्यवसायाभिमुख कसा करता येईल त्यासाठी आपण अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून कोणत्या योजना आखल्यात? त्याविषयी सांगा.**

**उत्तर :** नव्या नेप-आधारित अभ्यासक्रमाचे नवे स्वरूप आणि त्याचे वेगळेपण थोडक्यात सांगायचे तर, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शैक्षणिक स्तर, व्यवसायाभिमुखता, रोजगाराभिमुखता, बहुज्ञानशाखीय, आंतरज्ञानशाखात्मक, विद्यार्थीकेंद्री, संशोधनकेंद्री, अधिक व्यावहारिक, अधिक प्रायोगिक, प्रत्यक्ष कार्याभिमुख, व्यापक, बहुआयामी, मराठी भाषा आणि साहित्याचे अनेकानेक नवे-जुने आयाम कवेत घेणारा असा हा अभ्यासक्रम आहे. या चारवर्षीय अभ्यासक्रमाच्या रचनेत 'मराठी साहित्य' आणि 'मराठी भाषा' असे दोन मुख्य(मेजर) विषय घेण्यात आले असून त्यातील अभ्यासपत्रिकांची एकूण संख्या जवळपास ५० च्या घरात असून यात मानद(ऑनर्स) आणि संशोधन(रिसर्च) अशा दोन प्रकारच्या पदव्या संबंधित मेजर विषयात विद्यार्थ्यांना प्राप्त करता येतील.

**प्रश्न : समकालीन मराठी साहित्य प्रांतात उल्लेखनीय रचनात्मक लिहिणारे साहित्यिक आणि साहित्य कोणते?**

**उत्तर :** समकालीन याचा अर्थ नव्वदोत्तर असा मी घेतो! या कालखंडातही विविध आकृतिबंधांतून लिहिणारे स्वयंभू आणि उत्तम साहित्यिक मराठीत आहेत. त्यापैकी काही कथा-कादंबरीकार आणि कवींची प्रातिनिधिक नावे पुढीलप्रमाणे सांगता येतील. सदानंद देशमुख, श्याम मनोहर, गौरी देशपांडे, सानिया, रंगनाथ पठारे, रमेश इंगळे उत्रादकर, आशा बगे, प्रवीण बांदेकर, कृष्णात खोत, मिलिंद बोकील, मेघना पेठे, मंगला गोडबोले, कविता महाजन, अभिराम भडकमकर, शरणकुमार लिंबाळे, नामदेव कांबळे, राजन गवस, रवींद्र शोभणे, शिरीष गोपाळ देशपांडे, जयंत पवार, भारत सासणे, प्रतिमा जोशी, उर्मिला पवार, आसाराम लोमटे, मोनिका गजेंद्रगडकर, सुरेंद्र दरेकर, अरुणा ढेरे, रजनी परूळेकर, अनुराधा पाटील, प्रभा गणोरकर, संतोष पवार, प्रज्ञा पवार, दासू वैद्य, इंद्रजित भालेराव, केशव सखाराम देशमुख, श्रीकांत देशमुख, मंगेश नारायण काळे,नीरजा, अरुण म्हात्रे, संदीप खरे, अशोक नायगावकर, श्रीधर तिळवे, दिनकर मनवर, जयश्री हरी जोशी इत्यादि.

**प्रश्न : साहित्यातील कोणत्या साहित्यिकाचा/वादाचा आपल्यावर प्रभाव आहे का? आणि त्या प्रभावातून आपण लेखन करीत असता का? याविषयी सांगा.**

**उत्तर :** तसं तर कोणत्याही एकाच अथवा एकदोन साहित्यिकांचा प्रभाव असा सांगता येणार नाही, कारण प्राचीन ते अर्वाचीन असे मला आवडणारे, प्रभावित करणारे ललित साहित्यिक व समीक्षक अनेक आहेत. अधिक विशेषत्वाने प्रभावित करणा-यांमध्ये संत ज्ञानदेव, संत नामदेव,संत चोखामेळा, संत तुकाराम, संत रामदास, मोरोपंत, लोकमान्य, विष्णुशास्त्री, केशवसुत, तांबे, बालकवी, रा.ग.गडकरी, सावरकर, आंबेडकर, कुसुमाग्रज, अनिल, ना.घ. देशपांडे, मर्ढेकर, मुक्तिबोध, गाडगीळ, भावे, माडगूळकर, राष्ट्रसंत, गदिमा, गोनिदा, पाडगावकर, पु.ल.देशपांडे, आरती प्रभु(खानोलकर), नेमाडे, रणजित देसाई, महानोर, शांताबाई, मनोहर, ग्रेस, वा.ल., ढेरे, विनोबा, मे.पु.रेगे, दभि, रसाळ, काळे, पेंडसे, सरदार, श्री.मा.कुलकर्णी, सदानंद मोरे, मा.गो.वैद्य, रमेश पतंगे इत्यादि लेखक, विचारक, समीक्षक, संशोधक, संपादक ह्यांनी माझी एकूण समावेशी अशी विचारदृष्टी, वाङ्मयदृष्टी व सांस्कृतिक-देशीय समीक्षादृष्टी घडवली असावी असे मला वाटते. वाद-विचारसरणीच्या प्रभावाविषयीचे उत्तर पूर्वीच्या एका प्रश्नात आले आहे!

**प्रश्न: मराठीचा अभ्यासक्रम प्राचीनतेवर अधिक भर देणारा आणि आधुनिकतेला, नवनवीन संकल्पनेला गौणत्व देणारा म्हणून मराठीची पीछेहाट होत आहे का? आपले मत काय?**

**उत्तर :** नाही ! असे मला वाटत नाही! मराठी भाषा आणि साहित्य यांचा अभ्यास म्हटले की तो प्राचीन ते अर्वाचीन असा सामग्र्यानेच करावा लागणार! साहित्यात प्राचीन-अर्वाचीन असा भेद करता येत नाही! तेराव्या शतकापासून २०व्या शतकापर्यंतचा काळ धरण्यास प्राचीन-मध्ययुगीनच्या वाट्याला अधिक काळ येतो! वाङ्मयीन सकसता आणि श्रेष्ठत्व हे कालसापेक्ष नसतं! प्राचीन जर कालबाह्य असेल आणि आधुनिक जर उथळ व निम्नस्तरीय असेल तर दोन्ही त्याज्यच! काही लोकांचा जुनं ते सोनं असा जसा गैरसमज असतो, तसा काही लोकांचा नवं ते सोनं असा गैरसमज असतो! शिकण्यात-शिकविण्यात उत्तम आणि दर्जेदार वाङ्मयाचा समावेश असला आणि ते ज्ञान योग्यरीतीने विद्यार्थ्यांपर्यंत पोचले तर ख-या अर्थाने मराठीची पीछेहाट न होता भरभराट होईल!

**प्रश्न : आज मराठीच्या अध्यापन करताना महत्त्वाची कोणते बदल करावे लागेल? मराठीच्या अध्यापनाची महत्त्वाची सूत्रे कोणती म्हणजे अध्यापन अधिक विद्यार्थीलक्ष्यी आणि व्यवहारलक्ष्यी होईल?**

**उत्तर** : कुठल्याही अध्यापकाने आपल्या विषयाचा व्यासंग करण्यासोबतच ज्ञानाच्या संदर्भात, माहितीच्या संदर्भात आणि नव्या तंत्रज्ञानाच्या संदर्भात अद्ययावत असले पाहिजे. नव्या नव्या कालसापेक्ष गोष्टी अवगत करून घेतल्या पाहिजेत आणि नव्या युगानुकूल साधनांच्या, माध्यमांच्या साहाय्याने अभिजात साहित्याचे कालनिरपेक्ष मोठेपण विद्यार्थ्यांपुढे मांडत राहिले पाहिजे. कारण आपण तेच असतो पण जग बदलतं, तसा विद्यार्थीवर्गही बदलत असतो! त्या अनुषंगाने आपल्यालाही अपडेट व्हावे लागते. उत्तम अध्यापकाला याशिवाय दुसरा पर्याय नसतो! अध्यापन हे विद्यार्थीलक्ष्यी जसे असते, तसे ते ज्ञानलक्ष्यीही असावे! व्यवहारलक्ष्यी वा कालसापेक्ष असतात ते अभ्यासक्रम आणि अध्यापनाच्या नवनव्या तांत्रिक पद्धती! पण त्यांचाही उपयोग अध्यापनासाठी किती प्रमाणात करायचा हे विवेक बाळगूनच अध्यापकास ठरवावे लागते. कारण नवी तंत्रज्ञाने ज्ञानदानाच्या प्रक्रियेत अडथळा सुद्धा ठरू शकतात! फॅशनेबल, दिखाऊ वृत्तीने व अंधानुकरणातून ती स्वीकारली आणि वापरली तर!डॉ. घरत :तर तसे अजूनही मनात शिल्लक आहेत. खूप गोष्टी अजून तुमच्याकडून जाणून घ्यायच्या आहेत. हा संवाद पुढेही असाच सुरू रहावा असे वाटते! पण काळवेळेलाही मर्यादा असल्याने इथे थांबू या! यानंतरही आपणाकडून भरीव व नवे असे, नव्या पिढीतील समीक्षकांना योग्य दिशा देणारे समीक्षात्मक लेखन व्हावे हीच आपल्याकडून अपेक्षा! आपण मुलाखतीसाठी वेळ दिला त्याबद्दल आपले मनापासून आभार!

सह्याद्रीचा राखणदार



# जिल्हाप्रमुख जिवतोडे यांच्या कार्यालयाला भेट देऊन घेतला कार्याचा आढावा

## वरोरा–भद्रावती विधानसभेत शिवसेनेचा भगवा फडकवा–किशोरी पेडणेकर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

वरोरा - भद्रावती विधानसभेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे चांगले वर्चस्व आहे. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेने याठिकाणी भगवा फडकवला होता. जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात पुन्हा एकदा विजयाची पुनरावृत्ती घडवून आणून आगामी विधानसभा निवडणुकीत शिवसेना (उबाठा) गटाचा भगवा पुन्हा फडकविण्यासाठी तयारीला लागा असा आदेश मुंबईच्या माजी महापौर व शिवसेना (उबाठा) गटाच्या उपनेत्या तथा महिला विभाग संघटक किशोरी पेडणेकर यांनी शिवसैनिकांना दिला.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेना (उबाठा) गटाच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात ठिकठिकाणी पक्षाच्या नेत्यांचे दौरे सुरू आहे. पक्षाचे कार्य घराघरात पोहचविण्यासाठी नेते मंडळी जोमाने कमी लागली आहे. पक्ष कार्याचा आढावा तसेच सामान्य जनतेशी थेट संवाद साधण्याचे काम शिवसेनेच्या वतीने करण्यात येत आहे. अशातच विदर्भाच्या दौऱ्यावर आलेल्या मुंबईच्या माजी महापौर , शिवसेना उपनेत्या तथा महिला विभाग संघटक





किशोरी पेडणेकर यांनी वरोरा - भद्रावती विधानसभेत शिवसेना ( उबाठा) गटाच्या वतीने सुरू असलेल्या कार्याचा आढावा घेण्यासाठी वरोरा येथील जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या जिल्हा कार्यालयाला भेट दिली. जिल्हाप्रमुख जिवतोडे यांच्या नेतृत्वात पक्षाच्या वतीने सुरू असलेल्या अनेक समाजउपयोगी कार्याचा माहिती घेत शिवसैनिकांना शाब्बासकी दिली व आगामी विधानसभा निवडणुकीत जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात वरोरा - भद्रावती विधानसभेत शिवसेनेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा भगवा फडकविण्यासाठी तयारी लागा असा आदेश शिवसैनिकांना दिला.यावेळी युवासेना जिल्हा समन्वयक तथा माजी नगरसेवक दिनेश यादव,शिवसेना उपजिल्हा प्रमुख अमित निब्रड,तालुका प्रमुख विपीन काकडे,विधानसभा संघटक सुधाकर मिलमिले, माजी उपजिल्हा प्रमुख तथा माजी नगरसेवक वसंता मानकर, माजी उपजिल्हा प्रमुख रमेश मेश्राम,शिवदूत बंडु डाखरे, माजी नगरसेविका सुषमा भोयर, नगरसेविका प्रणाली मेश्राम, माजी तालुका प्रमुख नागेंद्र चटपल्लीवार, तालुका संघटक बाळा क्षीरसागर, शहर प्रमुख संदीप मेश्राम,मीडिया प्रमुख गणेश चिडे, शिवदूत मनिष ठक,महिला संघटिका अल्का पचारे, वंदना डाखरे, सागर पिपंळशेंडे, मनिष दोहतरे,महेश जिवतोडे, निखिल मांडवकर,किशोर ढवस,नागेंद्र झाडे,जितेंद्र गुलानी,राजु गावंडे अनिकेत सातपुते, प्रफुल चौधरी, आकाश चतुरकर व समस्त पदाधिकारी,शिवसैनिक, युवासैनिक, महिला संघटिका उपस्थित होते.

# गुरु गोविंद सिंग अधर्म,अत्याचार आणि अन्याय विरोधात लढणारे ऐतिहासिक महापुरुष–आ. किशोर जोरगेवार

## गुरु गोविंद सिंग यांच्या जयंती निमित्त पडोली येथील गुरुद्वारा येथे कार्यक्रमाचे आयोजन

**पडोली । प्रतिनिधी**

गुरु गोविंद सिंग यांच्या संपूर्ण जीवनातून आपल्याला अत्याचार आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा मिळते. ते एक ऐतिहासिक महापुरुष होते त्यांची लढाई अधर्म, अत्याचार आणि अन्याय विरोधात होती. त्यांची शिकवण प्रेरणादायी असल्याची भावना आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केली.शिखांचे दहावे गुरू, गुरु गोविंद सिंग जी यांचे आज ३५७ वे प्रकाश पर्व आहे. या निमित्त पडोली येथील गुरुद्वारा येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी उपस्थित राहत दर्शन घेतले. यावेळी पडोली येथील गुरु तेगबहादुर साहेब गुरुद्वाराचे अध्यक्ष राणा पालसिंग, बलदेव सिंग, जगतार सिंग, हरदियाल सिंग, नागी आणि मारबा परिवारातील सदस्यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.सर्वांनाच आपल्या नावाचीही इतिहासात नोंद व्हावी असे वाटते पण जे ऐतिहासिक महापुरुष होते. त्यांनी कधीही जमीन,



धन-संपत्ती, राजसत्ता-प्राप्ती किंवा यशप्राप्तीसाठी लढाई केली नाही. गुरु गोविंद सिंग असेच एक ऐतिहासिक महापुरुष होते. आज त्याच्या ३५७ व्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पडोली येथील तेगबहादुर साहेब गुरुद्वारा येथेही कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी आमदार किशोर जोरगेवार यांची उपस्थिती होती. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी दर्शन घेतले. या कार्यक्रमाला शीख समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# राज्यस्तरीय खंजिरी भजन स्पर्धा

**पुलगाव । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवाच्या निमित्त राष्ट्रीय ओबीसी मोर्चा नाचणगाव व श्री.गजानन गुरुदेव सेवा मंडळ नाचणगाव यांच्या वतीने राज्यस्तरीय भव्य खंजिरी भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक २०,२१ व २२ जानेवारीला बाजार चौक नाचणगाव येथे स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

ही स्पर्धा पुरुष गट,महिला गट व बालघाट अशा तीन गटांमध्ये आयोजित करण्यात आली असून प्रत्येक गटामध्ये रुपये ७५ हजार ची वेगवेगळी बक्षिसे देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे विविध नैपुण्यासाठी उत्तम गायक, उत्तम खंजिरी वादक,उत्तम तबला गायक इत्यादि पुरस्कार घोषित करण्यात आले आहे. दररोज सायंकाळी सहा वाजता सामुदायिक प्रार्थनेचे आयोजन करण्यात आले आहे. अजित कडकडे यांचे पट शिष्य अमित लांडगे यांची सुद्धा मैफिल आयोजित करण्यात आली आहे.दि.२० ला आमदार रणजित कांबळे हे स्पर्धेचे उद्घाटन करणार असून ओबीसी मोर्चाचे राष्ट्रीय संयोजक नितीन चौधरी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मनोज वसु, डॉक्टर श्रीकृष्ण दळवी, केशव दांडेकर, प्रमोद बिरे, संजय पवार, राजू कोचर, राम ढाकूलकर, प्रवेश चिनेवार, विक्की पाखरे, हरि चांदोरे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहे. जास्तीत जास्त भजन मंडळींनी स्पर्धेत सहभागी व्हावे व जनतेने या राज्यस्तरीय खंजिरी भजन स्पर्धेचा लाभ घ्यावा, राष्ट्रीय ओबीसी मुक्ती मोर्चाचे तुषार पेंढारकर यांनी केले आहे.

# कौटुंबीक वादातुन दोघावर गोळीबार मोहोळ तालुक्यातील घटना

**मोहोळ :** कौटुंबिक वादातून दोघा जणावर गोळीबार करण्यात आला, मात्र तो प्रयत्न यशस्वी झाला. हा प्रकार शेटफळ- पंढरपूर महामार्गावरील आष्टी शिवारात शनिवार ता १३ रोजी रात्री सव्वा आठ वाजण्याच्या सुमारास घडला.दरम्यान या प्रकरणी संशयावरून पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले आहे. या घटनेमुळे परिसरात घबराट पसरली आहे, या प्रकरणी मोहोळ पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. मोहोळ पोलिसां कडून मिळालेल्या माहिती नुसार, पटवर्धन कुरोली ता पंढरपूर येथील रहिवाशी सिद्धेश्वर ब्रह्मदेव नाईकनवरे व त्याचा नातेवाईक आदित्य व्यवहारे हे दोघे मोटरसायकल वरून घराकडे निघाले होते.त्याचवेळी तिघा अज्ञातानी विना नंबर प्लेटच्या मोटरसायकलवर येऊन त्यांची मोटरसायकल अडवली व तिघांपैकी एकाने त्याच्या जवळ असलेल्या बंदुकीतून गोळीबार केला. मात्र तो फसला. दरम्यान आपल्यावर हल्ला होतोय समजल्यावर नाईकनवरे व व्यवहारे हे दोघे जीव वाचविण्यासाठी ऊसात पळून गेले, तर संशयित मोटरसायकल वरून पळून गेले. पळून गेलेले संशयित हे २५ ते ३० वयोगटातील होते.या घटनेची माहिती मिळताच मोहोळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेशकुमार राऊत, पोलीस उपनिरीक्षक पी पी झालटे यांनी तातडीने घटनास्थळ गाठले व पाहणी केली. त्याच वेळी उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती, स्थानिक गुन्हे शाखेचे पथक घटनास्थळावर दाखल झाले.घटनास्थळा वरून पोलिसांनी दोन जिवंत काडतुसे जप्त केली आहेत. संशयीतांच्या शोधात पोलीस पथक पाठवण्यात आले असून, सीसीटीव्ही फुटेज व काही धागेदोरे मिळतात का ते पोलिसांचे तपासण्याचे काम सुरू आहे. या प्रकरणी सिद्धेश्वर ब्रह्मदेव नाईकनवरे यांनी मोहोळ पोलिसात फिर्याद दिली असून, अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक पी पी झालटे करीत आहेत.

# मोदींचे महाराष्ट्र दौरे वाढले : नाशिक-मुंबईनंतर १९ जानेवारीला येणार सोलापुरात; त्याच दिवशी शरद पवारही असणार शहरात

**मुंबई**–नाशिक आणि मुंबई दौऱ्यानंतर पुढच्याच आठवड्यात पुन्हा एकदा पंतप्रधान मोदी महाराष्ट्र दौऱ्यावर येत आहेत. सोलापूर शहरात १९ जानेवारी रोजी त्यांचा रोड शो आणि रे कॉलनीच्या कार्यक्रमासाठी येत आहेत. त्याच दिवशी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी सांगोला आणि मंगळवेढा येथे कार्यक्रम घेतल्याने सोलापूर जिल्ह्याचे राजकीय वातावरण चांगलचं तापणार आहे. या दोन मोठ्या नेत्यांच्या दौऱ्यामुळे अनेक राजकीय उलथापालथी होण्याची शक्यता आहे.दरम्यान या दौऱ्यावेळी शरद पवार हे सोलापूर जिल्ह्यातील मतदारसंघाची राजकीय गणितं जुळवणार का हे देखील पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. शरद पवार यांच्या सोबत माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे देखील उपस्थित राहणार आहेत. तसेच शरद पवारांचे जुने सहकारी आणि माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्यासह राष्ट्रवादी अजित पवार गटाचे जिल्ह्यातील आमदारही हजेरी लावणार असल्याची माहिती मिळतेय. त्यामुळे सोलापुरात त्या दिवशी राजकीय फटकेबाजी पाहायला मिळणार असल्याचं म्हटलं जातंय.सांगोल्याचे माजी आमदार कै. गणपतराव देशमुख यांच्या स्मरणार्थ त्यांचे नातू डॉ अनिकेत देशमुख यांनी गणेशरत्न राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे



आयोजन केले आहे. यासाठी १९ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता शरद पवार हे सांगोल्यात पोहचतील. तसेच या कार्यक्रमासाठी सुशीलकुमार शिंदे , विजयसिंह मोहिते पाटील आणि शेकाप नेते आ जयंत पाटील यांची उपस्थिती असणार आहे .या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी अजित पवार गट, शिवसेना शिंदे गट आणि भाजप च्या अनेक आजीमाजी आमदारांनाही निमंत्रण करण्यात आलंय.यामध्ये पवारांवर कायम टोकाची टीका करणारे भाजप खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर , आमदार गोपीचंद पडळकर , आमदार जयकुमार गोरे , आमदार समाधान अवताडे असणार आहेत . याशिवाय सांगोल्याचे आमदार शहाजीबापू पाटील , आमदार राम सातपुते , आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांची उपस्थिती आहे .पवारांचे जुने सहकारी आणि अजित पवार गटाचे आमदार बबनदादा, संजयमामा शिंदे , दीपक साळुंखे अशी दिग्गजांची उपस्थित असणार असल्याची माहिती देण्यात येतेय. या सत्ताधाऱ्यांना उत्तर देण्यासाठी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार आणि काँग्रेसच्या आमदार प्रणिती शिंदे यांची उपस्थिती असणार आहे .येणाऱ्या लोकसभा निवडणुकांसाठी माढ्याची जागा ही इंडिया आघाडीमधून शरद पवार यांच्याकडे जाण्याची शक्यता आहे. परंतु राष्ट्रवादी शरद पवार गटाकडे या जागेसाठी तितका ताकदवान उमेदवार नसल्यामुळे शरद पवार यांची या जागेसाठी चाचपणी सध्या सुरु आहे. त्याचप्रमाणे माढा लोकसभा मतदारसंघात धनगर समाजाची मते निर्णायक असल्याने या मतदारसंघातून महायुतीत नाराज असलेले महादेव जानकर, शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे प्रवक्ते लक्ष्मण हाके यांच्या नावावर देखील चर्चा सुरू आहे.

# सातारा जिल्ह्यातील नागरिकांना टोलमाफी द्या:आनेवाडी टोल नाक्यावर शिवसेनेचे ठिय्या, ८ दिवसाचा दिला अल्टिमेटम

**सातारा**–पुणे-बेंगलोर महामार्गावरील आनेवाडी आणि तासवडे टोलनाक्यावर अन्यायकारक टोल वसुली सुरू आहे. या ठिकाणी सातारा जिल्ह्यातील वाहनांना टोल माफी झालीच पाहिजे, या मागणीसाठी शिवसेनेच्या ठाकरे गटाने आनेवाडी टोलनाक्यावर आक्रमक होत काल सुमारे अर्धा तास ठिय्या मांडला. शिवसैनिकांच्या या आंदोलनामुळे महामार्गावर दुतर्फा वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.संबंधित कंपनीच्या अधिकार्याने आठ दिवसात तोडगा काढण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते मागे घेण्यात आले आहे. मात्र आठ दिवसात यावर तोडगा न निघाल्यास यापेक्षा तीव्र आंदोलन शिवसेना स्टाईलने करण्यात येईल, असा इशारा ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सचिन मोहिते यांनी दिला आहे.सातारा जिल्ह्यातून पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग १२१ किलोमीटरचा जातो. या मार्गावर सातारा जिल्ह्यात आनेवाडी आणि तासवडे येथे दोन टोलनाके आहेत. सातार्याच्या नागरिकांना जिल्हा अंतर्गत कुठेही जायचे झाल्यास अगदी कमी अंतराचा प्रवास करायचे म्हटले तरी टोलची रक्कम भरावी लागते. ही सातारकर नागरिकांची एक प्रकारची लूट आहे. या कारणाने स्थानिक नागरिक व टोल प्रशासनात वारंवार वाद होतात, ही मागणी घेऊन उद्धव ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सचिन मोहिते यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांनी सोमवारी सकाळी साडेअकरा वाजता ठिय्या आंदोलन केले.या ठिय्या आंदोलनाच्या दरम्यान कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. शिवसैनिकांनी टोल नाक्यावर जय भवानी जय शिवाजी या घोषणा देत अन्यायकारक टोलमाफी झालीच पाहिजे, अशी नारेबाजी केली. आनेवाडी टोलनाक्याच्या दोन्ही बाजूला शिवसैनिकांनी ठिय्या मांडला. टोल माफी दिल्याशिवाय मागे फिरणार नाही, असा आक्रमक पवित्रा त्यांनी घेतला.यावेळी भुईंज आणि सातारा तालुका पोलिसांनी आंदोलकांना शांत करण्याचा प्रयत्न केला. मात्र मागणी मान्य झाल्याशिवाय माघार घेणार नसल्याचे शिवसैनिकांनी सांगितले. या आंदोलनामध्ये अर्धा तास गेला. यामुळे महामार्गावरील सहा लाईनवरील वाहतूक पूर्णपणे थांबली. परिणामी वाहनांच्या सुमारे एक किलोमीटर लांबीच्या रांगा लागल्या. त्याने प्रवाशांचा खोळंबा झाला. शिवसैनिक मात्र ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. संबंधित कंपनीचे अधिकार्यांनी तेथे येऊन शिवसैनिकांशी संवाद साधला. याबाबत त्वरित बैठक घेऊन निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .